# केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषि विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाचे 3 महिने मुदतीचा पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम

राज्यातील प्रादेशिक कृषि व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था (रामेती) यांचेमार्फत कृषि विभागातील विविध योजनांमधील तांत्रिक बाबी अवगत होणेविषयी क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी वेगवेगळे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. रामेतीमार्फत आयोजित मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन याबाबत पायाभूत प्रशिक्षणाचा कालावधी 3 महिन्याचा असुन हे प्रशिक्षण क्षेत्रिय स्तरावरील कृषि पर्यवेक्षक,कृषि सहाय्यक व कृषि सेवक यांच्यासाठी आयोजित करण्यात येते. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेअतंर्गत शासन निर्णय क्र.राकृवि 2012/प्रक्र.35(भाग-1)/राकृवियो कक्ष,4 जुलै,2012 अन्वये नविन योजना म्हणून सन 2012-2013 ते सन 2016-17 या कालावधीत रु.1060.50 लाख इतक्या खर्चासह राज्यात राबविण्यास मान्यता मिळाली आहे.

## प्रशिक्षणाची उद्दीष्टे :-

1. नव्याने नियुक्त केलेल्या कृषि सेवकांना मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रमातील विविध योजनांची प्राथमिक माहिती देणे.
2. क्षेत्रिय स्तरावर कार्यरत कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक यांना मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन योजनांचे अद्ययावत ज्ञान उपलब्ध करुन देणे.
3. केंद्र व राज्य शासनामार्फत लोकसहभागातून मेगा पाणलोट विकास यावर आधारीत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत पाणलोट विकास कार्यक्रम यासारख्या योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या योजनांच्या मार्गदर्शक सुचनानुसार पाणलोट प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी राज्यामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाची अत्यंत आवश्यकता आहे. याकरीता संबंधित क्षेत्रिय कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे अत्यंत गरजेचे आहे.

**प्रशिक्षण कार्यक्रमाची व्याप्ती :-** सन 2014-15 या वित्तीय वर्षाकरीता राज्यातील सर्व 33 जिल्हयातील प्रशिक्षणार्थीसाठी प्रादेशिक स्तरावर खोपोली (रायगड), नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, कोल्हापूर व नागपूर येथील रामेतीमध्ये प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येईल.

**निधी तरतूद:-** पुणे येथील रामेतीकरीता प्रति प्रशिक्षणार्थी रु.400/- व उर्वरीत संस्थांसाठी प्रति प्रशिक्षणार्थी रु.350/- प्रतिदिन या दराने निधी वितरीत करण्यात येत असून प्रत्येक तीन महिन्याचे 40 प्रशिक्षणार्थीचे एक सत्र याप्रमाणे आर्थिक वर्षात दोन सत्रे आयोजित करावयाची आहेत. त्याचप्रमाणे नवीन

..2

नियुक्त कृषि सेवकांसाठी (40प्रशिक्षणार्थी) एक महिन्याचे एक सत्र असा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचा आहे. याप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रतिवर्ष रक्कम रु.212.10 लाख निधीची तरतूद करण्यात आली आहे, त्यानूसार प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा.

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | रा.कृ.वि.यो अंतर्गत सन 2012-13 ते 2016-17 या 5 वर्षासाठी मंजूर कार्यक्रम | मंजूर कार्यक्रमानूसार सन 2012-13 ते 2016-17 या 5 वर्षातील प्रशिक्षणार्थींची संख्या | सन 2014-15 या वित्तीय वर्षातील मंजुर निधी (रक्कम रुपये लाख) | मंजूर कार्यक्रमानूसार सन 2014-15 या वित्तीय वर्षातील प्रशिक्षणार्थींची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, खोपोली, जि.रायगड | 147.00 | 600 | 29.40 | 120 |
| 2 | प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, पुणे | 168.00 | 600 | 33.60 | 120 |
| 3 | प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नाशिक. | 147.00 | 600 | 29.40 | 120 |
| 4 | प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर. | 147.00 | 600 | 29.40 | 120 |
| 5 | प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद. | 147.00 | 600 | 29.40 | 120 |
| 6 | प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, अमरावती. | 147.00 | 600 | 29.40 | 120 |
| 7 | प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर. | 147.00 | 600 | 29.40 | 120 |
| | **एकूण** | 1050.00 | 4200 | 210.00 | 840 |
| 8 | 1.00 टक्का आकस्मिक निधी | 10.50 | ----- | 2.10 | ---- |
| | **एकूण** | 1060.50 | 4200 | 212.10 | 840 |

१. प्रत्येक वर्षातील मंजूर प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण होणेकरीता सर्व विभागीय कृषि सहसंचालक, यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या कृषि पर्यवेक्षक/कृषि सहाय्यक/कृषि सेवक यांचेमधून 40 प्रशिक्षणार्थींची 90 दिवसाचे 2 सत्रामधील प्रशिक्षणासाठी निवड करावी व संबंधित रामेतीस प्रशिक्षणार्थींची यादी पाठविण्यात यावी. तसेच, नव्याने नियुक्त होणा-या कृषि सेवक यांचेमधून 40 प्रशिक्षणार्थींची 30 दिवसाचे 1 सत्रामधील प्रशिक्षणासाठी निवड करुन संबंधित रामेतीस प्रशिक्षणार्थींची यादी पाठविण्यात यावी.

२. योजनेअंतर्गत मंजूर प्रशिक्षण कार्यक्रमानूसार प्रत्येक वर्षी कृषि पर्यवेक्षक/कृषि सहाय्यक/कृषि सेवक यांच्यासाठी 90 दिवसाचे 40 प्रशिक्षणार्थीचे दोन सत्रामध्ये तसेच नव्याने नियुक्त होणा-या कृषि सेवक यांचेसाठी 30 दिवसांचे 40 प्रशिक्षणार्थीचे एका सत्रामध्ये रामेतीमार्फत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा. शासनाकडून राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत मंजूर प्रशिक्षण कार्यक्रमानूसार पूर्णपणे निधी प्राप्त होणार आहे.

३. प्रत्येक वर्षातील मंजूर निधी पूर्णपणे खर्च होण्याच्या दृष्टीने रामेती स्तरावरुन प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे.

४. प्रत्येक वर्षातील प्रशिक्षण कार्यक्रमाचे महिनानिहाय नियोजन (ट्रेनिंग कॅलेंडर) आयुक्तालयास सादर करावे.

५. प्रत्येक वर्षामध्ये वितरीत केलेल्या निधीचे विनियोगाबाबत दरमहा 10 तारखेपर्यन्त उपस्थित प्रशिक्षणार्थींची यादी व खर्चाचा अहवाल, तसेच विहीत प्रपत्रातील उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्तालयास सादर करण्यात यावे.

६. शासन निर्णय क्र. राकृवि 2012/प्रक्र.35(भाग-1)/ राकृवियो कक्ष, 4 जानेवारी 2014 अन्वये सदर योजनेतील प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सद्यस्थितीतील कृषि सेवक/कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक या प्रशिक्षणार्थीसह कृषि विभागात सरळ सेवेने नियुक्त झालेल्या महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ, गट-ब व गट-ब(कनिष्ठ) अधिका-यांचा प्रशिक्षणार्थी म्हणून समावेश करण्यात आला आहे. त्यानूसार सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये कृषि विभागात सरळ सेवेने नियुक्त होणा-या महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ, गट-ब व गट-ब(कनिष्ठ) अधिका-यांचे प्रशिक्षणाचे वनामती मार्फत आयोजन करण्यात यावे.